महा मेट्रो

PUNE METRO

**महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड**

**(पुणे मेट्रो रेल प्रकल्प)**

**“अर्बन मोबिलिटी इंडिया २०१८ चे मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्‌घाटन”**

**“पुणेरी पगडी मेट्रो स्टेशन हे आकर्षणाचे केंद्र”**

**पुणे ०२ : नागपूर येथे आयोजित ११ व्या अर्बन मोबिलिटी इंडिया कॉन्फ्रेंस २०१८ चे राज्याचे मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्‌घाटन करण्यात आले. यावेळी कॉन्फ्रेंस अध्यक्ष म्हणून केंद्रीय भूपुष्ट रस्ते वाहतूक व जहाजबांधणी मंत्री श्री. नितीन गडकरी आणि विशेष अतिथी म्हणून केंद्रीय गृहनिर्माण व नागरी विकास मंत्री श्री. हरदीप सिंह पुरी, फ्रांस चे राजदूत अलेझ्हांद्रे झिगलर, जर्मनी चे राजदूत मार्टिन ने, केंद्रीय सचिव भारत सरकार ( गृह निर्माण आणि नगर विकास) श्री. दुर्गा शंकर मिश्रा, महा मेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. ब्रिजेश दीक्षित उपस्थित होते. सिविल लाईन्स येथील चिटणवीस सेंटर येथे या अर्बन मोबिलिटी इंडिया कॉन्फ्रेंस अँन्ड एक्स्पोचे आयोजन करण्यात आले. ग्रीन थीम संकल्पनेवर आधारित अर्बन मोबिलिटी इंडिया कॉन्फ्रेंस अँन्ड एक्स्पोमध्ये भारतातील अन्य मेट्रो रेलने सुद्धा यामध्ये सहभाग घेतला आहे ज्यामध्ये; मुंबई,दिल्ली,चेन्नई,कोची,मेगा यांचा प्रामुख्याने समावेश आहे. पुणे मेट्रो प्रकल्पाचे स्टॉल हे ग्रीन थीम वर असून नागपूर मेट्रोने यावर्षी प्रॉपर्टी डेव्हलपमेंट वर आधारित स्टॉलचे निर्माण केले आहे.**

या कॉन्फ्रेंसच्या निमित्याने चिटणवीस सेंटर येथे पुणे आणि नागपूर मेट्रो प्रकल्पाचे वैशिष्ठ्य दाखवनारे स्टॉल तयार करण्यात आले होते.ग्रीन पुणे या थीम वर पुणे मेट्रो चा स्टॉल तर  प्रॉपर्टी डेव्हलपमेंट या विषयावर नागपूर मेट्रोच्या स्टॉलचे निर्माण करण्यात आले होते. पुण्याचा मेट्रो प्रकल्प हां कश्या प्रकारे पर्यावरणपूरक असेल याच्या विविध छटा स्टॉल च्या माध्यमाने दर्शविण्यात आल्या होत्या. महत्वाच म्हणजे पुणे मेट्रो प्रकल्पाच्या स्टॉलस वर असलेले पुणेरी पगडी हे सर्वांचे लक्ष वेधून घेत होते. या दोन्ही स्टॉल चे उद्‌घाटन मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी केले.यावेळी केंद्रीय मंत्री श्री. नितीन गडकरी,केंद्रीय मंत्री श्री.हरदीप सिंह पुरी,राज्याचे उर्जा मंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे, महा मेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. ब्रिजेश दीक्षित,पुणे महानगरपालिकेच्या महापौर श्रीमती. मुक्त टिळक, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे महापौर श्री.राहुल जाधव उपस्थित होते.